# पोदार इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी घेतली ऊर्जा संवर्धनाची शपथ





राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन सप्ताहाच्या निमित्ताने पोदार इंटरनॅशनल स्कूल येथे सोमवार दि. 19 डिसेंबर 2011 रोजी ऊर्जा संरक्षणावर आधारीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी विद्यार्थ्यांना ऊर्जा बचतीची प्रतिज्ञा देण्यात आली.

अध्यक्षस्थानी प्राचार्य मुनीश शर्मा होते. याप्रसंगी अक्षय ऊर्जा जनजागृती अभियानाचे ए. बी. सांगवे यांची प्रमुख उपस्थिती होती. या सप्ताहाचा समारोप लातूर येथील पोदार इंटरनॅशनल स्कूल येथे करण्यात आले. याप्रसंगी लातूर येथील ऊर्जा लेखापरिक्षक केदार खमितकर, अभियंता किरण खमितकर , शाळेतील शिक्षकवृंद व कर्मचारी यांची उपस्थिती होती.

विद्यार्थ्यांना सांगवे यांनी ऊर्जा बचतीचे विविध उपाय आत्मसात करुन वीजेचा वापर आपल्या दैनंदिन जीवनात कमीत कमी कसा करावा, याबद्दल माहीती दिली. सिएफएल बल्बाचा वापर करावा बीईई स्टार रेटेड असलेले उपकरणांचा वापर करावा. ऊर्जा बचत म्हणजेच ऊर्जेची निर्मिती व प्रदुषणापासून मुक्ती असा सूचक संदेश या कार्यक्रमाच्या माध्यतातून देण्यात आला.

विजेचा वापर कमी होऊन अक्षय ऊर्जा वापराचे प्रमाण वाढले पाहिजे. यासाठी अक्षय ऊर्जा जनजागृती अभियान सुरु करण्यात आले आहे.

**ENERGY CONSERVATION DAY 14 TH DEC 2011**